**<u>ठळक बातम्या</u>**

- केवळ आधार कार्डाच्या आधारे दिलेले किंवा संशयास्पद वाटणारे जन्म-मृत्यूचे दाखले आणि नोंदी तत्काळ रद्द करण्याचे राज्य महसूल विभागाचे आदेश

- दिव्यांग नागरिकांबाबत अपमानजनक टिप्पणी करणाऱ्यांविरोधात कडक कायदा करावा, असे सर्वोच्च न्यायालयाचे केंद्र सरकारला निर्देश

- हाँगकाँगमध्ये निवासी संकुलात लागलेल्या आगीत मृत्युमुखी पडलेल्यांचा आकडा ६५ वर

**आणि**

- उच्चांकी पातळीवर टिकून राहण्यात सेन्सेक्स आणि निफ्टीला अपयश

**<><><><><>**

केवळ आधार कार्डाच्या आधारे दिलेले किंवा संशयास्पद वाटणारे जन्म-मृत्यूचे दाखले आणि नोंदी तत्काळ रद्द करा, तसंच याप्रकरणी पोलिस तक्रारी दाखल करण्याचे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल प्रशासनाला दिले आहेत. यासंदर्भातलं परिपत्रक महसूल विभागानं आज जारी केलं. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून..

***व्हाइस कास्ट***

*(अमरावती, सिल्लोड, अकोला, छत्रपती संभाजीनगर शहर, लातूर, अंजनगाव सुर्जी, अचलपूर, पुसद, परभणी, बीड, गेवराई, जालना, अर्धापूर आणि परळी या ठिकाणी या मोहिमेवर अधिक भर दिला जाणार आहे. १६ मुद्द्यांच्या आधारे या दाखल्यांची तपासणी केली जाईल. यासाठी विशेष मेळाव्यांचं आयोजन करून प्रकरणं निकाली काढली जातील. ज्या प्रकरणांमध्ये केवळ आधार कार्डला पुरावा मानून जन्म मृत्यू दाखले दिले गेले आहेत, ते आदेश त्रुटीपूर्ण मानले जातील. अर्जातली माहिती आणि आधार कार्डवरील जन्मतारीख यामध्ये तफावत आढळली तर संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल केला जाईल. जे लाभार्थी मूळ प्रमाणपत्र परत करणार नाहीत किंवा जे आता सापडत नाहीत, त्यांची यादी*

*बनवून त्यांना 'फरार' घोषित करा आणि FIR दाखल करा असंही या परिपत्रकात म्हटलं आहे. ११ ऑगस्ट २०२३ च्या सुधारणेनंतर नायब तहसीलदारांनी वितरीत केलेले जन्म-मृत्यू नोंदीचे आदेश परत घेण्याचे आणि रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.)*

**<><><><><>**

टोक्यो इथे झालेल्या डेफलिम्पिकमध्ये भारतीय खेळाडूंनी केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी त्यांचं अभिनंदन केलं आहे. दृढनिश्चय आणि समर्पण भावनेनं खेळलं तर यश मिळू शकतं हे या खेळाडूंनी पुन्हा एकदा सिद्ध केलं आहे. संपूर्ण देशाला या खेळाडूंचा अभिमान वाटतो, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. यंदा झालेल्या डेफिलिंपिकमध्ये भारताने ९ सुवर्ण, ७ रौप्य आणि ४ कास्यपदकांसह २० पदकांची कमाई केली आहे. टी-ट्वेंटी विश्वचषक जिंकणाऱ्या अंध महिला क्रिकेट संघाचीही मोदी यांनी भेट घेतली. या संघाने स्वाक्षरी असलेली बॅट प्रधानमंत्र्यांना भेट दिली. भारतीय संघाने कोलंबो इथे झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात नेपाळचा पराभव करून विश्वविजय मिळवला.

**<><><><><>**

दिव्यांग नागरिकांबाबत अपमानजनक टिप्पणी करणाऱ्यांविरोधात कडक कायदा करावा, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयानं आज केंद्र सरकारला दिले. एका कार्यक्रमात एसएमए या आजारानं ग्रस्त असलेल्यांबद्दल अपमानकारक टिप्पणी केल्याप्रकरणी एसएमए क्युअर फाउंडेशन या संस्थेनं दाखल केलेल्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती कायद्याच्या धर्तीवर दिव्यांगांबद्दल अपमानजनक टिप्पणी करणं हा शिक्षापात्र गुन्हा ठरवणारा कायदा करण्याचा विचार सरकारनं करावा, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठानं सुचवलं. यासंदर्भात दिशानिर्देश तयार करायचं काम सुरू असल्याची माहिती, माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं न्यायालयाला दिली. ऑनलाईन मंचांवर अश्लील, अपमानकारक आणि

बेकायदा आशयावर नियंत्रण ठेवण्यासाठी एका तटस्थ, स्वतंत्र आणि स्वायत्त यंत्रणेची गरज असल्याचं मत पीठानं नोंदवलं.

<><><><><>

कर्नाटक काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या संघर्षाप्रकरणी राहुल गांधी, मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्याशी चर्चा करणार असल्याची माहिती काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी दिली आहे. सिद्धरामय्या यांच्या जागी मुख्यमंत्री होण्याची शिवकुमार यांची इच्छा आहे. मात्र ५ वर्षांसाठी निवडून आलेलं असताना मध्येच सिद्धरामय्या यांनी राजीनामा देण्याचं काहीच कारण नसल्याचं वक्तव्य त्यांचा मुलगा यथिंद्र यांनी आज केलं. पक्षश्रेष्ठी हा वाद आठवडाभरात सोडवतील, असा विश्वास गृहमंत्री जी. परमेश्वर यांनी व्यक्त केला. तेही मुख्यमंत्रीपदासाठी इच्छुक आहेत. सिद्धरामय्या यांना हटवलं तर महागात पडेल, असा इशारा कर्नाटकातल्या अल्पसंख्य, मागास आणि इतर समाजानं दिला आहे. तर वोक्कलिंग समाजानं शिवकुमार यांना न्याय देण्याची मागणी केली आहे.

<><><><><>

इफ्फी अर्थात भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात बॉलिवूड अभिनेता आमीर खान यांनी आज सामाजिक परिवर्तनाचे कथाकार या विषयावर मास्टरक्लास घेतला. चित्रपटांमध्ये लेखन आणि कथाकथन तसंच, अभिजात कथा आणि कल्पनाविष्कार यावेत यासाठी लेखकांना प्राधान्य देण्याची गरज यावेळी खान यांनी व्यक्त केली. या महोत्सवात आज ‘अ पोएट’ हा चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. तसंच, व्ही. शांताराम यांनी दिग्दर्शित केलेला ‘डॉ. कोटनीस की अमर कहानी’, १९८२ साली प्रदर्शित झालेला ‘केलॅमिटी’ हा चेक चित्रपट आणि मणिरत्नम यांनी दिग्दर्शित केलेला ‘गीतांजली’ हे चित्रपटही आज दाखवण्यात आले.

उद्या, ‘अ युजफुल घोस्ट’ या थाई चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर इफ्फीची सांगता होणार आहे.

<><><><><>

आयआयटी दिल्लीनं डासांना पळवून लावू शकणाऱ्या प्रभावी डिटर्जंट पावडरचा शोध लावला आहे. या डिटर्जंटनं कपडे धुतल्यानं डास चावणार नाहीत. त्यामुळं डासांपासून पसरणारे मलेरिया, डेंग्यू आणि चिकनगुनिया यासारख्या आजारांवर नियंत्रण मिळवण्यासाठी ते प्रभावी ठरेल. या डिटर्जंटची चाचणी घेण्यात आल्याची माहिती आयआयटी दिल्लीच्या टेक्सटाईल आणि फायबर इंजिनियरिंगचे प्राध्यापक जावेद नबीबबक्ष शेख यांनी दिली आहे.

<><><><><>

हाँगकाँगमध्ये निवासी संकुलात लागलेल्या काल लागलेल्या आगीत मृत्युमुखी पडलेल्यांचा आकडा ६५वर गेला आहे. मृतांमध्ये अग्निशमन दलाच्या एका जवानाचाही समावेश आहे. या दुर्घटनेत ७० जण जखमी झाले आहेत. तर एकंदर २७९ जण अद्याप बेपत्ता असल्याची माहिती हाँगकाँगचे नेते जॉन ली यांनी दिली आहे. आग विझवायचे प्रयत्न अजूनही सुरू आहेत. या संकुलातल्या आठपैकी सात इमारतींना काल आग लागली होती. यापैकी तीन इमारतींमध्ये परिस्थिती नियंत्रणात आहे. सुमारे ९०० जणांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे.

<><><><><>

इंडोनेशियामध्ये मुसळधार पावसानं आलेला पूर आणि जमीन खचल्यानं ३४ जणांचा मृत्यू झाला आहे. अजून ५२ लोक बेपत्ता असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. इंडोनेशियात आलेल्या चक्रीवादळानं सुमारे ८ हजार लोकांना सुरक्षित स्थळी हलवलं आहे.

<><><><><>

देशातल्या शेअर बाजारांनी आज विक्रमी पातळीला स्पर्श केला मात्र त्यानंतर नफेखोरी झाल्यानं दोन्ही निर्देशांक घसरले. सकाळी व्यवहार सुरू झाले तेव्हापासूनच बाजारात तेजी होती. व्यवहाराच्या दरम्यान सेन्सेक्सनं ४४६ अंकांची तेजी नोंदवून ८६ हजार ५६ च्या विक्रमी पातळीला स्पर्श केला होता. निफ्टीनं १०५ अंकांच्या वाढीसह २६ हजार ३१० अंकांची विक्रमी पातळी गाठली होती. त्यानंतर नफा वसुली सुरू झाल्यानं दोन्ही निर्देशांकात घसरण दिसून आली. दिवसअखेरच्या चढउतारानंतर मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स अखेर १११ अंकांची वाढ नोंदवत ८५ हजार ७२१ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १० अंकांची वाढ नोंदवून २६ हजार २१५ अंकांवर स्थिरावला.

**<><><><><>**

सुलतान अझलान शहा चषक हॉकी स्पर्धेत भारताच्या संघानं न्यूझीलंडवर ३-२ अशी मात केली. मलेशिया इथं झालेल्या या सामन्यात भारताकडून अमित संजय रोहिदास, संजय आणि सेल्वम कार्थी यांनी प्रत्येकी एक गोल केला, तर न्यूझीलंडकडून जॉर्ज बेकर यानं दोन गोल केले. आता भारताचा पुढचा सामना परवा कॅनडाविरुद्ध होणार आहे.

**<><><><><>**

सय्यद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत भारताची १६ वर्षीय बॅडमिंटनपटू तन्वी शर्मा हिनं माजी विश्वविजेती नोझोमी ओकुहारा हिला नमवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. लखनौ इथं सुरू असलेल्या या स्पर्धेच्या उपउपांत्यपूर्व सामन्यात तिनं नोझोमी हिच्यावर १३-२१, २१-१६, २१-१९ अशी मात केली. याशिवाय, त्रीसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांनी महिला दुहेरीत, तर उन्नती हुडा, इशाराणी बरुआ, मिथुन मंजुनाथ, किदंबी श्रीकांत, प्रियांशू राजावत आणि मनराज सिंह यांनी एकेरी विभागात उपांत्यपूर्व फेरी गाठली.

**<><><><><>**

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान राज्य मंत्री जितीन प्रसाद यांनी आज गोरखपूर-इज्जतनगर एक्सप्रेस रेल्वेला दूरदृश्य प्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखवला. याआधीची गोरखपूर-पिलिभीत एक्सप्रेस रेल्वे आजपासून इज्जतनगरपर्यंत जाणार आहे. या रेल्वेमुळे बरेली ते पिलिभीत रेल्वेसेवेत अधिक सुधारणा होईल, असं मत अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केलं आहे.

<><><><><>

बांग्लादेशच्या माजी प्रधानमंत्री शेख हसीना यांना आज ढाक्याच्या एका न्यायालयाने भूखंड घोटाळा प्रकरणी दोषी ठरवून २१ वर्षांच्या कारावासाची शिक्षा दिली आहे. त्याच आरोपाखाली हसीना यांच्या दोन्ही मुलांना प्रत्येकी ५ वर्षांची, तर त्यांच्या २० मंत्र्यांना निरनिराळ्या कालावधीची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. याआधी १७ नोव्हेंबर रोजी बांग्लादेशच्या एका विशेष फौजदारी न्यायाधिकरणाने शेख हसीना आणि तत्कालीन गृहमंत्री असदुज्जमान खान कमाल यांना मानवताविरोधी गुन्ह्यांखाली मृत्युदंडाची शिक्षा दिली होती. शेख हसीना यांनी सध्या भारतात आश्रय घेतला आहे. तसंच कमाल हेदेखील भारतातच लपून असल्याचं म्हटलं जात आहे.

//<><><><><>//